दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३०३ ■ मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -303 ■ Tuesday, 25 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## शेतकऱ्यांना ३ हजारांची वाढीव आर्थिक मदत; मुख्यमंत्र्यांची घोषणा, लवकरच वर्षाला एकूण १५ हजार

**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या 'नमो किसान सन्मान निधी'मधील राज्याचा वाटा तीन हजार रुपयांनी वाढविण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले. यामुळे केंद्राचे सहा हजार आणि राज्याचे नऊ हजार असे १५ हजार रुपये शेतकऱ्यांना दरवर्षी मिळतील, असे ते म्हणाले.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारच्या भागलपूरमध्ये 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने' १९ व्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. या वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वनामती येथील सभागृहात घेण्यात आला. यावेळी राज्याचे कृषी राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, की प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात आर्थिक मदत मिळत आहे. योजनेंतर्गत केंद्र शासन वर्षाला शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६ हजार रुपये वितरित करते. तर राज्य शासनाच्या वतीने 'नमो किसान सन्मान निधी योजनेद्वारे' वर्षाकाठी ६ हजार रुपयांची मदत देण्यात येते. राज्य शासन या निधीत ३ हजार रुपयांनी वाढ करणार असून त्यामुळे शेतकऱ्यांना वर्षाला १५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे.

या कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वनामती परिसरातील कृषी प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी प्रदर्शनीला भेट देऊन विविध दालनांची पाहणी केली तसेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला.

तिजोरीवर आणखी बोजा

लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना म ोफत वीज अशा निवडणूकपूर्व लोकप्रिय घोषणांमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण येऊन खर्चात कपात करावी लागली असताना शेतकऱ्यांच्या अनुदानात तीन हजारांनी वाढ केल्याने तिजोरीवरील आणखी बोजा पडणार आहे. त्यामुळे वित्तीय तूट आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षात ७० टक्के खर्च करण्याचे आदेश वित्त विभागाने सर्व खात्यांना दिले आहेत.

## देशांतर्गत घटनांसाठी भारताला दोष देणाऱ्या बांगलादेशची परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी केली कानउघडणी

### बांगलादेशने ठरवावे, त्यांना कसे संबंध हवे

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

देशांतर्गत घटनांसाठी भारताला दोष देणा-या बांगलादेशने भारतासोबत नेमके कसे संबंध हवे आहेत याचा निर्णय बांगलादेशने करावा, असे प्रतिपादन परराष्ट्र मंत्री सुब्रमण्यम जयशंकर (ड. गरळीहरपज्ञरी) यांनी केले आहे.

बांगलादेशकडून वारंवार दोन्ही देशांमधील सौहार्दाच्या वातावरणाला तडे देणारे प्रकार घडल्यानंतर जयशंकर यांनी थेट कानउघडणी करणारे हे वक्तव्य केले आहे. बांगलादेशच्या तत्कालिन पंतप्रधान शेख हसीना यांनी देश सोडला आणि मोहम्मद युनूस सत्तेवर आल्यापासून भारत आणि बांगलादेशमधील संबंध तणावपूर्ण आहेत. तेथील हिंदूंच्या नरसंहारावर भारताने जोरदार आवाज उठवला आहे. त्याचवेळी बांगलादेशचे अंतरिम सरकार मात्र भारतासोबतचे संबंध बिघडवण्यात कोणतीही संधी सोडत नाही.

नुकतेच ओमानमध्ये भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी बांगलादेशचे परराष्ट्र व्यवहार सल्लागार मोहम्मद तौहीद हुसेन यांची भेट घेतली होती. पण बांगलादेश सुधारत नसल्यामुळे या बैठकीनंतर सुमारे आठवडाभरानंतर परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी बांगलादेशच्या प्रतिकूल वर्तनाचा मुद्दा उपस्थित केला. यासंदर्भात जयशंकर म्हणाले की, बांगलादेशला ठरवावे लागेल की ते आपल्याशी ते कशा प्रकारचे संबंध ठेवू इच्छितात? बांगलादेशासोबतचा आमचा दीर्घ आणि विशेष इतिहास १९७१चा आहे.

बांगलादेश भारतासोबत चांगले संबंध हवे आहे असे म्हणू शकत नाही आणि दुसरीकडे तेथे होणाऱ्या देशांतर्गत घटनांसाठी भारताला जबाबदार धरत आहे.

बांगलादेशच्या अंतरिम सरकारमधील कोणीही दररोज उभे राहून प्रत्येक गोष्टीसाठी भारताला दोष देऊ शकत नाही. याबाबतचा निर्णय बांगलादेशला घ्यायचा आहे, असे सुतोवाच जयशंकर यांनी केले.

द्विपक्षीय संबंधांमधील सम स्यांमागे दोन पैलू आहेत. पहिला म्हणजे अल्पसंख्याकांवरील जातीय हिंसाचार. बांगलादेशात अल्पसंख्याकांविरुद्ध हिंसाचार सुरू आहे. त्याचा परिणाम आपल्या विचारांवर नक्कीच झाला आहे. हा एक मुद्दा आहे ज्यावर आपण बोलले पाहिजे. आणि दुसरे म्हणजे बांगलादेशचे राजकारण आहे. आता त्यांनीच ठरवावं की त्यांना आम च्याशी कसे संबंध ठेवायचे आहे?

## परभणीत दुर्सयांदा अवयवदान; ग्रीन कॉरिडॉरद्वारे पाचही अवयव गरजूपर्यंत पोहोचले, प्रत्यारोपणही यशस्वी

**परभणी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'मरावे परी किर्ती रूपे उरावे'असे म्हणतात. जगाचा निरोप घेतल्यानंतरही अवयवदानाच्या प्रक्रियेत एका युवकाचे डोळे, दोन किडनी, हृदय, फुफ्फुस असे अवयव पाच गरजू रुग्णांच्या कामी आले. दुचाकी अपघातात गंभीर जखमी झालेल्या युवकास रूग्णालयात नेले असता मेंदुमृत झाल्याचे निदान झाल्यानंतर कुटुंबियांनी त्याच्या अवयवदानास संमती दिली. येथील देवगिरी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये पूर्ण करण्यात आली. परभणीत झालेले हे दुसरे अवयवदान आहे.

जिंतूर तालुक्यातील चिंचोली दराडे येथील दीपक विलासराव दराडे (वय २६ वर्षे) यास शनिवारी संध्याकाळी जिंतूर-औंढा महामार्गांवर एका पेट्रोलपंपाजवळून स्वतःच्या शेतातून पायी घरी जात असताना एका दुचाकीने जोराची धडक दिली. मात्र या अपघातात त्याच्या शरिरावर कुठलीही जखम नव्हती. आपल्याला काहीच झालेले नाही असे समजून तो रात्री घरी जाऊन झोपला. दुर्सया दिवशी सकाळी तो झोपेतून उठत नसल्यामुळे नातेवाईकांनी त्याला परभणी येथे देवगिरी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले. त्याठिकाणी डॉ.एकनाथ गबाळे यांनी तपासणी करून अपघातात डोक्याअंतर्गत रक्तस्त्राव होऊन तो मेंदूमृत (ब्रेनडेड) झाल्याचे सांगितले. अशा स्थितीत रूग्णाचे अवयव दान करता येतात, अशी माहितीही त्यांनी नातेवाईकांना दिली.

त्यानंतर दीपकचे वडील विलास श्रीपतराव दराडे, आई कुसुम विलास दराडे, भाऊ राजू दराडे, माधव दराडे व मामा ॲड. भगवानराव घुगे व गणेशराव घुगे यांनी परभणी येथील देवगिरी रुग्णालयाचे संचालक डॉ. एकनाथ गबाळे व डॉ. अतुल जाधव यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि दीपकच्या अवयवदानास संमती दिली. दरम्यान डॉ.गबाळे यांनी राज्यस्तरीय अवयवदान समन्वय समितीला ही माहिती कळवली. त्यानुसार पुर्वी नोंदणी केलेल्या रूग्णांच्या गरजेनुसार पाचही अवयव दीपकच्या शरिरातून काढून त्या त्या शहरांमध्ये तातडीने ग्रीन कॉरिडॉर तयार करून पाठवण्यात आले. तसेच चार तासाच्या आत त्या पाचही अवयवांचे गरजूंच्या शरिरात प्रत्यारोपण करण्यात आले.अशी माहिती अवयवदान समन्वयक विनोद डावरे यांनी दिली.

## महाराष्ट्रातील सर्व आमदारांना लवकरच 'छावा' चित्रपट दाखवणार - अजित पवार

नवी दिल्ली : छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'छावा' (उहहररींर) सिनेमानं सर्वत्र धुमाकूळ घातला आहे. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर सर्व रेकॉर्ड तोडतो आहे. 'छावा'ची क्रेझ इतकी आहे सगळीकडे हाऊसफुल्ल शो सुरू आहेत. छत्रपती संभाजी महाराजांचं शौर्य, पराक्रम, त्यांचं बुद्धीचातुर्य पाहून प्रत्येकाचं मन गर्वानं फुलून जातंय. आता हा 'छावा' चित्रपट महाराष्ट्रातील सर्व आमदारांना चित्रपट दाखवण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकताच 'छावा' चित्रपट पाहिला आहे. यानंतर आता राज्यातील सर्व आमदारांना हा चित्रपट दाखवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबद्दल माहिती दिली. दिल्लीत झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप प्रसंगी बोलताना अजित पवार म्हणाले, ङ्गमहाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून सुरू होत आहे. त्यानंतर ४ आणि ५ मार्च रोजी सर्व आमदारांना मंत्रालयासमोर असलेल्या चित्रपटगृहात 'छावा' चित्रपट दाखवण्यात येणार आहेङ्घ. आमदारांना चित्रपट दाखवण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्याचं सांगितलं. अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनींही 'छावा' चित्रपटाचं कौतुक केलं आहे. तसेच हा चित्रपट गोवा आणि मध्य प्रदेशमध्ये करमुक्त करण्यात आलाय.या चित्रपटाला देशातूनच नाहीतर परदेशातूनही जोरदार प्रतिसाद मिळत आहे. छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणारा अभिनेता विक्की कौशलचं प्रेक्षक भरभरून कौतूक करताना दिसत आहेत. सिनेमात रश्मिका मदांनाने महाराणी येसूबाईच्या भूमिकेला न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे. तर अक्षय खन्नाने औरंगजेबची भूमिका केली आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित या चित्रपटाने आतापर्यंत ३२६.७२ कोटींचा टप्पा ओलांडला आहे.

## महापालिका निवडणुका कधी होणार? आजच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणीकडे राज्यातील सर्वांचे लक्ष लागून राहिले असून, न्यायालय या संदर्भात शासनाला काय निर्देश देते आणि पुढील सुनावणीची तारीख काय देते याचीच उत्सुकता सर्वांना लागली आहे. त्यामुळे मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात की, मे महिन्यांत की ऑक्टोबरमध्ये जाणार हे या सुनावणीतून स्पष्ट होईल.

मुंबई महापालिकेसह विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागील पाच ते सहा वर्षांपासून झालेल्या नाहीत. या निवडणुकांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहेत. अनेक महिन्यांपासून न्यायालयात पाचिका सुनावणीसाठी आली नव्हती. २८ जानेवारी २०२५ रोजी याची सुनावणी होऊन लवकरच याबाबतचा निर्णय दिला जाईल आणि निवडणुकीचा मार्ग खुला होईल, असे बोलले जात होते; परंतु न्यायालयाने पुढील सुनावणीची तारीख २५ फ ेब्रुवारीपर्यंत पुढे उकलल्याने महापालिकेच्या निवडणुका ऑक्टोबर महिन्यातच होतील अशाप्रकारचे तर्कवितर्क लढवण्यास सुरुवात झाली आहे; परंतु काही विधी तन्ज आणि निवडणूक विभागातील निवृत्त अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मंगळवारी सर्वोच्च न्यायालय नक्की पुढील तारीख देते की काही स्पष्ट निर्देश देते याकडे सर्वांचे लक्ष असेल.

मुंबई महापालिकेचे २२७ प्रभागांच्या तुलनेत २३६ प्रभाग आघाडी सरकारच्या काळात करण्यात आले असून जुलै २०२२ मध्ये सेना भाजपा सरकार आल्यानंतर त्यांनी हा निर्णय रद्द केला. याला विरोधकांनी आक्षेप नोंदवत मुंबई उच्च न्यायालयात याचिका केली होती, या याचिकेवर न्यायालयाने शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार २२७ प्रभाग राखण्याबाबत निर्णय दिल्याने मा निर्णयाविरोधात विरोधी पक्षाने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली आहे. त्यामुळे २२७ की २३६ प्रभाग, ओबीसी या अशा विविध याचिकेंची एकत्रित सुनावणी होणार आहे.

## गरीब कैद्यांचा जामीन आता सरकार भरणार

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गरिबीमुळे दंडाची किंवा जामिनीची रक्कम भरता येत नसल्याने देशभरातील कारागृहांत आजही अनेक कैदी बंदिस्त आहेत. परिणामी क्षमतेपेक्षा दुप्पट ते चौपट कैदी कोंबण्यात आल्यामुळे कारागृह की कोंडवाडे, अशी परिस्थिती कारागृहांत आहे. ही कोंडी फोडण्यासाठी सरकारकडूनही पावले उचलण्यात येत आहेत.

अशा सर्व कैद्यांच्या दंडाची व जामिनाची रक्कम केंद्र सरकार भरणार आहे. यापूर्वीच त्याची सुरुवात मध्य प्रदेश, झारखंड, छत्तीसगडमध्ये झाली असून आता महाराष्ट्रातदेखील ही योजना राबवली जाणार आहे.

महाराष्ट्रात एकूण ६० कारागृह असून त्यामध्ये मध्यवर्ती ९, जिल्हा २८, विशेष कारागृह रत्नागिरी १, मुंबई जिल्हा महिला १, किशोरी सुधारालय, नाशिक १, खुले १९, तर खुली वसाहत १ यांचा समावेश आहे. या कारागृहात एकूण कैद्यांची क्षमता २६ हजार ३७७ असताना ३१ जानेवारी २०२४ पर्यंत तेथे ४० हजार ४८५ कैदी आहेत. बलात्कार किंवा खून, विनयभंग, हत्याकांड, आर्थिक फसवणूक, अमली पदार्थांची विक्री, लाचखोरी, देशविघातक कारवाई, नक्षलवादी कारवाई आणि गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यात शिक्षा झालेल्या कैद्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. ८ कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा दुप्पट कैदी ठेवण्यात आले आहेत. राज्यात ६० कारागृहे असून त्यापैकी गर्दी झालेल्या ८ कारागृहांतील कैद्यांना आता खुल्या कारागृहात पाठविण्यात येत आहे.

## 'राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती' निमित्त स्वच्छता सर्वेक्षण २०२५ विशेष प्रचार कार्यक्रम उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालय, केंद्रीय संचार ब्यूरो, छ. संभाजीनगर व नवजीवन सोसायटी फॉर रिसर्च अँड रिहॅबिलिटेशन ऑफ मेन्टली हँडिकॅप्ड ,छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने तर्फे नवाजीवन मतिमंद मुलांची शाळा व संरक्षित कार्यशाळा, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर येथे 'राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती' निमित्त स्वच्छ सर्वेक्षण २०२५ विषयावर विशेष प्रचार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा, शर्मिला गांधी, अधीक्षक, अभिजीत जोशी, केंद्रीय संचार ब्युरो, छत्रपती संभाजीनगरचे सहा. क्षेत्रीय प्रचार अधिकारी, प्रदीप पवार, सुजाता जोशी, संध्या मरेवाड आणि शाळेचे सर्व शिक्षक वर्ग व विध्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विशेष मुलांनी चित्रकला स्पर्धेत भाग घेतला व चित्र रंगवली. शिला तुमराव यांनी सुत्रसंचालन केले. प्रदीप पवार यांनी आपल्या प्रस्ताविकातून कार्यालय आणि स्वच्छता सर्वेक्षण २०२५ ची रूपरेषा सांगितली व आभार व्यक्त केले. चित्रकला स्पर्धेतील विजेते विशेष विद्यार्थी वेदांत इंगळे, अभिषेक शिंदे, शुभंकर, महेश मिरगणे आणि गौरव सुरडकर यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्र स्वच्छतेची शपथ घेतली. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता केंद्रीय संचार ब्यूरो व नवजीवन सोसायटी फॉर रिसर्च अँड रिहॅबिलिटेशन ऑफ मेन्टली हँडिकॅप्ड,छत्रपती संभाजीनगर च्या कर्मचाऱ्यांनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रेल्वेच्या विद्युतीकरणाची शताब्दी

रेल्वेचे विद्युतीकरण ही एक अग्रेसर तांत्रिक उपलब्धीच नव्हे, तर भारतीय रेल्वेचे वैशिष्ट्य असलेल्या प्रगतीच्या अदम्य भावनेचाही उत्सव आहे. भारतीय रेल्वेची कहाणी १८५३ मध्ये एका ऐतिहासिक क्षणापासून सुरू होते. बोरीबंदर (आताचे सीएसएमटी) ते ठाणे दरम्यानचा ३४ किलोमीटरचा पहिला प्रवास... आयात केलेल्या वाफेच्या इंजिनांनी चालणाऱ्या या सुरुवातीच्या गाड्यांनी कनेक्टिव्हिटीच्या एका नव्या युगाची सुरुवात केली. तथापि, १८९५ मध्ये भारताने एफ-क्लास स्टीम लोकोमोटिव्हसह आपली औद्योगिक क्षमता प्रदर्शित केली. ते अजमेरमध्ये तयार केलेले पहिले स्वदेशी इंजिन होते. ३८ टन वजनाचे आणि १५,८६९ रुपये खर्चून बांधलेले हे इंजिन एका नवोदित राष्ट्राच्या अभियांत्रिकी महत्त्वाकांक्षेचे प्रतीक होते. वाफेच्या इंजिनांनी आव्हाने पेलली. कोळसा आणि पाण्यावरील अवलंबित्वामुळे ही इंजिने चालवण्यास त्रासदायक बनली आणि आधुनिक मानकांनुसार त्यांची अकार्यक्षमता लवकरच उघड झाली. विसाव्या शतकाच्या मध्यात डिझेल इंजिनांचा उदय झाला. त्यामुळे रेल्वे वाहतुकीत क्रांती झाली. वायडीएमवर्गासारख्या अधिक शक्तिशाली, विश्वासार्ह आणि किफायतशीर डिझेल लोकोमोटिव्हमुळे रेल्वेला खडबडीत भूप्रदेशातून प्रवास करणे आणि दुर्गम भागांना जोडणे शक्य झाले. तरीही या इंजिनांना विशेषत: पर्यावरणीय स्थिरतेमध्ये मर्यादा होत्या. त्यामुळे स्वच्छ आणि अधिक कार्यक्षम उपाय म्हणजे विद्युतीकरणाचा मार्ग मोकळा झाला. भारतीय रेल्वे विद्युतीकरणाची शताब्दी साजरी करत असताना भूतकाळातील घडामोडी विसरता येणार नाहीत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एक तारखेला सादर केलेल्या अर्थसंकल्पात रेल्वेबाबत कोणत्याही प्रकारची मोठी घोषणा करण्यात आलेली नाही; पण अर्थसंकल्पात मिळालेल्या तरतुदीनंतर भारतीय रेल्वेने प्रवास सुधारण्यासाठी आपली योजना जाहीर केली. भारतीय रेल्वे पुढील दोन ते तीन वर्षांमध्ये शंभर अमृत भारत, ५० नमो भारत आणि दोनशे वंदे भारत ट्रेन (स्लीपर आणि चेअरकार प्रकार) चालवणार आहे. या गाड्यांमुळे देशातील रेल्वे कनेक्टिव्हिटी पूर्वीपेक्षा खूप चांगली होण्याची अपेक्षा आहे. देशभरात रेल्वे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी १७ हजार पाचशे नॉनएसी जनरल आणि स्लीपर कोच तयार करण्याची योजना आहे. अर्थसंकल्पात सरकारने भारतीय रेल्वेमध्ये अनेक सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. रेल्वेला एकूण २.५२ लाख कोटी रुपये मिळाले आहेत. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी ४.६ लाख कोटी रुपयांच्या नवीन प्रकल्पांवरही भर दिला आहे. ते पुढील चार ते पाच वर्षांमध्ये पूर्ण होणार आहेत. या प्रकल्पांमध्ये नवीन रेल्वे ट्रॅक टाकणे, स्थानकांची पुनर्बांधणी, विविध उड्डाणपूल आणि अंडरपास बांधणे यांचा समावेश आहे. ३१ मार्चपर्यंत असे १४०० डबे तयार होतील. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी दोन हजार नवीन जनरल कोच तयार करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. याशिवाय एक हजार नवीन उड्डाणपूल बांधण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. भारतीय रेल्वे या आर्थिक वर्षाच्या अखेरीला शंभर टक्के विद्युतीकरण साध्य करेल. सुरक्षिततेसाठी गुंतवणुकीवर सरकारचे लक्ष अधोरेखित करण्यात आले आहे. रेल्वे सुरक्षेसाठी एक लाख १६ हजार कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. ३१ मार्चपर्यंत १.६ अब्ज टन मालवाहतूक क्षमता गाठून रेल्वे एक मोठा टप्पा पार करणार आहे. त्यामुळे चीननंतर भारतीय रेल्वे मालवाहतूक करणारी जगातील दुसरी मोठी रेल्वे व्यवस्था बनली आहे. प्रत्येक तांत्रिक झेप देशाच्या वाहतूकविषयक पायाभूत सुविधा बळकट करत आहे. त्याचा पर्यावरणावरील प्रभाव कमी करत आहे आणि जागतिक स्तरावर देशाचे स्थान बळकट करत आहे. विद्युतीकरणामुळे भारताचे रेल्वेमार्ग प्रकाशित होतात. त्यामुळे शाश्वत आणि समृद्ध भविष्याचा मार्ग मोकळा होतो. चाकाच्या शोधामुळे जग किती तरी पटीने वेगाने पुढे जाऊ लागले. या वेगाला सप्टेंबर १८२५ मध्ये नवी दिशा मिळाली. त्यानंतर २८ वर्षांनी १६ एप्रिल १८५३ रोजी भारतात पहिल्यांदा ट्रेन धावली. ७२ वर्षांनंतर, ३ फेब्रुवारी १९२५ रोजी, भारतीय रेल्वेने आणखी एक अध्याय जोडला आणि प्रथमच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला अशी इलेक्ट्रिक ट्रेन चालवून नवीन विक्रम केला.

आता २०२५ मध्ये भारतात रेल्वेच्या विद्युतीकरणाची १०० वर्षे पूर्ण होत असताना, देश आपल्या ब्रॉडगेज नेटवर्कच्या शंभर विद्युतीकरणांच्या मार्गावर आहे, जो भारतीय रेल्वेच्या उपलब्धींमध्ये एक मैलाचा दगड ठरेल. ही कामगिरी भारतातील पहिल्या रेल्वे प्रवासाप्रमाणेच ऐतिहासिक आहे आणि भारतीय रेल्वेच्या विद्युतीकरणात प्रगतीचे शतक आहे. इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हचा अवलंब करण्यासाठी भारताला जास्त वेळ लागला. पहिली इलेक्ट्रिक पॅसेंजर ट्रेन १८७९ साली जर्मनीत धावली होती; पण हे तंत्रज्ञान भारतात पोहोचायला ४६ वर्षे लागली. इलेक्ट्रिक इंजिने फार कमी काळात आपली उपयुक्तता सिद्ध करण्यात यशस्वी झाली.

# साताऱ्याचा अजिंक्यतारा अजिंक्य ठेवणारे !!!

### (२४ फेब्रुवारी- ३ मार्च: छ.राजाराम महाराज भोसले जयंती व स्मृती सप्ताह विशेष.)

**संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कठीण परिस्थितीत मराठ्यांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी राजाराम महाराजांच्याकडे आली. यावेळी राजाराम महाराजांचे वय अवघे १९ वर्षे होते. राजाराम महाराज रायगडावरून निघून नोव्हेंबर १६८९च्या पहिल्या आठवड्यात जिंजीला पोहोचले. तेथे पोहोचल्यावर हडबडून न जाता त्यांनी स्वत:वर नियंत्रण ठेवले. मराठ्यांनी जिंजीलाच राजधानी केली. जिंजीला तीन लक्ष होनांचा खजिना होता. तो मराठ्यांनी ताब्यात घेतला. महाराजांनी जिंजीला राजदरबार भरविला. त्यांनी रामचंद्रपंत अमात्यांना हुकमतपन्हा हा किताब दिला. संताजी आणि धनाजी यांची सेनापतीपदी नियुक्ती केली. शंकरजी नारायण, नेमाजी शिंदे, हनुमंतराव घोरपडे अशा विश्वासू माणसांना बरोबर घेऊन त्यांनी जिंजीवरून राज्यकारभारास सुरुवात केली. अशी अधिक ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखातून अवश्यच वाचा... संपादक**



छत्रपती राजाराम महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे कनिष्ठ पुत्र आणि म राठेशाहीतील तिसरे छत्रपती होते. त्यांचा जन्म शिवपत्नी सोयराबाईच्या पोटी राजगडावर झाला. छ.शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. दि.११ मार्च १६८९ रोजी छ.संभाजी महाराजांची निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रसंगामुळे संपूर्ण मराठी साम्राज्य हादरले. अशा कठीण प्रसंगी सारासार बुद्धीने विचार करू शकतील, असे काही लोक छ.शिवाजी महाराजांनी अगोदरच मिळवून ठेवले होते. यांमध्ये रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकरजी नारायण, प्रल्हाद निराजी, इत्यादींचा समावेश होता. या सर्व मंडळींनी राजाराम महाराजांचा राज्याभिषेक केला. मोगलांच्या आक्रमणामुळे राजाराम महाराजांना रायगड सोडून जिंजीला जावे लागले. छ.संभाजी महाराजांच्या पाडावाने औरंगजेबाला आनंद झाला असला तरी, राजाराम महाराजांना कैद न झाल्याची गोष्ट त्याला खटकत होती. त्याने दक्षिणेत उतरून आदिलशाही सन १६८६ आणि कुतुबशाही सन १६८७ यांचा पाडाव केला. या प्रसंगानंतर तो विजापूराकडे मोगल सैन्याला प्रोत्साहन देण्यासाठी निघून गेला. त्याचा उद्देश असा होता की, उत्तरेतून येणाऱ्या मराठी सैन्याच्या वाटा अडविणे. तेथून पुढे औरंगजेबाने ब्रह्मपुरीला येऊन मराठ्यांचे गडकोट घेण्याची मोहीम सुरू केली.

छ.संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कठीण परिस्थितीत मराठ्यांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी राजाराम महाराजांच्याकडे आली. यावेळी राजाराम महाराजांचे वय अवघे १९ वर्षे होते. राजाराम महाराज रायगडावरून निघून नोव्हेंबर १६८९च्या पहिल्या आठवड्यात जिंजीला पोहोचले. तेथे पोहोचल्यावर हडबडून न जाता त्यांनी स्वतः वर नियंत्रण ठेवले. मराठ्यांनी जिंजीलाच राजधानी केली. जिंजीला तीन लक्ष होनांचा खजिना होता. तो मराठ्यांनी ताब्यात घेतला. महाराजांनी जिंजीला राजदरबार भरविला. त्यांनी रामचंद्रपंत अमात्यांना हुकमतपन्हा हा किताब दिला. संताजी आणि धनाजी यांची सेनापतीपदी नियुक्ती केली. शंकरजी नारायण, नेमाजी शिंदे, हनुमंतराव घोरपडे अशा विश्वासू माणसांना बरोबर घेऊन त्यांनी जिंजीवरून राज्यकारभारास सुरुवात केली. जिंजी हा बलाढ्य दुर्ग जिंकून घेण्याची जबाबदारी झुल्फिकारखानावर होती. राजाराम महाराजांना पराभूत करण्यासाठी तो बलाढ्य फौज घेऊन जिंजीला आला आणि किल्ल्याला वेढा दिला. हा वेढा सलग आठ वर्षे चालू होता. राजाराम महाराजांनी झुल्फिकारखानाला अधूनमधून तहाची बोलणी करून झुलवत ठेवले आणि हा वेढा यशस्वीपणे हाताळला. राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली ३०-३५ हजार मराठे सैन्य जमा झाले. हे सैन्य संताजी आणि धनाजी यांच्यामध्ये विभागले गेले आणि पुन्हा मोगलांविरुद्ध लढ्यास सुरुवात झाली. संताजी आणि धनाजी यांनी या वेढ्यात मोगली अधिकाऱ्यांना जेरीस आणले. मोगल सरदार रुस्तुमखान साताऱ्याचा अजिंक्यतारा किल्ला जिंकण्याच्या प्रयत्नात होता. तेव्हा राजाराम महाराजांनी रुस्तुमखानाकडे कुमक कमी असल्याची संधी ओळखून संताजी आणि धनाजी यांना खानाच्या विरुद्ध पाठविले. मराठ्यांनी खानाचा पराभव केला तो दिवस होता, २५ जानेवारी १६९०. या लढाईत मराठ्यांना ४ हजार घोडी मिळाली, तर खानाकडून त्यांनी एक लक्ष होन दंड वसूल केला. रुस्तुमखानावरील विजयामुळे मराठ्यांचा आत्मविश्वास वाढला. जीवनम रणाच्या या संघर्षामध्ये मराठ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांना पाठबळ देणे हेच मुख्य काम राजाराम महाराजांना करावयाचे होते. छत्रपती म्हणजे प्रजेचा पिता, रक्षणकर्ता या नात्याने त्यांनी हे काम अचूकरीत्या केले. येथून पुढे मराठ्यांच्या लढ्याचे लोकलढ्यात रूपांतर झाले. मराठ्यांनी रौद्ररूप धारण केल्याने पुढे मोगलांची बिकट अवस्था झाली.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

औरंगजेब उत्तरेकडील सरदारांकडून पैसे मागत होता, कारण मोगलांच्या सैन्याचे पगार थकले होते. एका वर्षात मोगलांकडील बरेच सैन्य, हत्ती, घोडे, उंट, खेचरे मारली जात होती. २७ वर्षे युद्धजन्य परिस्थितीमुळे १०-२० पैसे एक शेर मिळणारे धान्य १ ते २ रुपये शेर या दराने विकले जात होते. मोगल-मराठा संघर्षाचे हे स्वरूप साधनसामग्री आणि सहनशक्ती यांची परीक्षा होती. सर्व मोगल सैन्य या प्रदीर्घ युद्धाला कंटाळले होते. मोगलांकडे साधनसामग्री प्रचंड होती, तर मराठ्यांकडे अफाट सहनशक्ती होती. शेवटी सहनशक्तीने साधनसामग्रीवर विजय मिळविला. अशा भयंकर परिस्थितीम ध्ये मराठा सैनिकांच्या कुटुंबाचे संरक्षण करणे आवश्यक होते. ही जबाबदारी रामचंद्रपंत अमात्यांनी अचूकरीत्या बजाविली. बहुतांश मराठी कुटुंबियांना त्यांनी विशाळगडाच्या परिसरात आणि सह्याद्रीच्या खाली कोकणात सुरक्षित ठेवले. इकडे संताजी आणि धनाजी यांनी मिळून कासीमखान, अलीमर्दानखान, इस्माईलखान, खानजादाखान, हिम्मतखान अशा मोगलांच्या अनेक नामवंत सरदारांचा पराभव करून त्यांना कैद केले. कासीमखान आणि हिम्मतखान हे मोगलांचे प्रथम दर्जाचे सेनानी मारले गेल्यामुळे मोगल सैन्यामध्ये एक भीतीचे वातावरण तयार झाले. जिंजीच्या वेढ्यातून राजाराम महाराजांनी स्वतःची योग्य वेळी सुटका करून घेतली आणि ते विशाळगडाला आले. विशाळगडावरून साताऱ्याला आल्यावर त्यांनी भविष्यातील मोहिमांची दिशा ठरविली. वऱ्हाड आणि खानदेशवर हल्ले चढवावयाचे, बुऱ्हानपूरच्या उत्तरेला माळव्यात हल्ले करावयाचे म्हणजे मोगल सैन्य उत्तरेत निघून जाईल, असे नियोजन करण्यात आले; तथापि राजाराम महाराजांचा सिंहगड किल्ल्यावर मृत्यू झाला. त्यामुळे वर उल्लेखलेली योजना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. ब्रिटिश लायब्ररी, लंडन येथे मॅकेन्झी संग्रहात रामचंद्रपंत अमात्यांची दोन पत्रे आहेत. ही पत्रे १६९७ सालातील असून त्यातील एक राजाराम महाराजांना, तर दुसरे पत्र प्रल्हाद निराजींना लिहिलेले आहे. वरील योजनेस या पत्रांमधून दुजोरा मिळतो.

राजाराम महाराजांचे मोठेपण त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांम धून दिसून येते. त्यांनी एक महत्त्वाची गोष्ट केली, ती म्हणजे सत्तेचे योग्य विकेंद्रीकरण होय. मोगल साम्राज्याचे पतन होण्याचे एक कारण म्हणजे औरंगजेबाच्या हातामध्ये झालेले सत्तेचे अतिकेंद्रीकरण. लोक टिकविण्यासाठी राजाराम महाराजांना नवीन वतने द्यावी लागली. मराठा सेनापतींना हुकुमतपन्हा, वजारतमाब, हिम्मतबहादुर असे किताब दिले, सरदारांना सरंजाम दिले, जहागिऱ्या दिल्या. एका परिपक्व आणि कसलेल्या राजाने जे कर्तव्य पार पाडायला हवे होते, ते राजाराम महाराजांनी पार पाडले. त्यांच्या पत्रावर उमटविलेल्या दोन मुद्रा मिळतात. या दोन्ही मुद्रा संस्कृतमध्ये असून त्यामध्ये पुढील श्लोक आहे-

'श्री प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णूविश्ववंदिता!
शिवसुनोरिय मुद्रा राजारामस्य राजते!!'

अर्थ: प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणे कलेकलेने वाढत जाणारी उत्तरोत्तर पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे परिपूर्ण होऊन सकळ विश्वाला वंद्य होणारी शिवाजी महाराजांचे पुत्र राजाराम महाराजांची ही मुद्रा लोककल्याणार्थ विराजत आहे.

'श्री धर्म प्रद्योतिता शेषवर्ण दाशरथेरिव!
राजारामस्य मुद्रेय विश्ववंद्या विराजते!!'

अर्थ: धर्माला उत्तेजन किंवा प्रोत्साहन देणारी दशरथ पुत्र श्रीरामाप्रमाणे संपूर्ण विश्वाला वंदनीय असणारी राजाराम छत्रपतींची ही मुद्रा शोभत आहे.

औरंगजेबाने आदिलशाही आणि कुतुबशाही संपविल्यानंतर त्याची १६८९ ते १६९१ ही तीन वर्षे विजापूर आणि गोवळकोंडा या प्रदेशाचा ताबा घेण्यात गेली. या कालावधीत मराठ्यांना मोठी संधी निर्माण झाली. गनिमीकाव्याने युद्ध करणारे मराठे नंतर खुल्या मैदानावर लढाया जिंकू लागले. सन १६९५पासून औरंगजेबाला मराठ्यांच्या या उग्ररूपाची कल्पना येऊ लागली. झुल्फिकारखानाने वेढा दिल्यामुळे राजाराम महाराज जिंजीच्या किल्ल्यात अडकून पडले होते. जिंजी जिंकण्यासाठी औरंगजेबाने ज्यादाची कुमक, तोफा आणि दारूगोळा पाठवून दिला. जिंजीला वेढा देणाऱ्या झुल्फिकारखानास गोवळकोंड्याचे राज्य मिळविण्याची सुप्त महत्त्वाकांक्षा होती. तो वजीर असदखानाचा मुलगा होता. राजाराम महाराजांनी त्याला गोवळकोंड्याचे राज्य मिळवून देतो, असे सांगत जिंजीच्या वेढ्यात ७-८ वर्षे काढली. जिंजीचा वेढा हे केवळ नाटक आहे, ही गोष्ट सर्वांना माहीत झाली होती. राजाराम महाराजांनी राज्य मिळवून देण्याचे असेच अमिष कामबक्ष याला दाखविले होते. महाराजांनी थेट कामबक्षला पत्र लिहिले आणि त्याला सांगितले की, तुला दिल्लीच्या तख्तावर बसवितो. या अमिषाला बळी पडून कामबक्ष याने असदखान आणि झुल्फिकारखान यांना कैद करण्याची योजना आखली. त्यामुळे मोगल सैन्यात खूप गोंधळाची स्थिती निर्माण झाली. याचाच फायदा घेऊन सर्व दिशांनी मराठे मोगलांवर तुटून पडले. महाराष्ट्रापासून ते जिंजी-तंजावरपर्यंत मुघलांना विरोध करू शकेल, असा एकमेव घटक हिंदुस्थानमध्ये शिल्लक राहिला होता, तो म्हणजे मराठे.

राजाराम महाराजांनी कृष्णाजी अनंत सभासदांकडून शिवचरित्र ग्रंथ लिहून घेतले. हा मराठी भाषेचा आणि शिवचरित्राचा ऐतिहासिक ठेवा आहे. त्यांच्या प्रेरणादायी चरित्राचा अभ्यासपूर्ण परामर्श घेणारा हा ग्रंथ आहे. राजाराम महाराजांनी महाराणी ताराबाईना युद्धकला, राजनीतीचे स्वातंत्र्य दिले. त्यामुळे ताराबाईनी मराठा साम्राज्याचे मोठ्या हिमतीने संवर्धन आणि संरक्षण केले. राजाराम महाराज हे पराक्रमी, निर्भीड, मुत्सद्दी, समंजस, धोरणी, प्रजावत्सल राजे होते. मोगलांशी कडवी झुंज देत स्वराज्याचे रक्षण आणि संवर्धन करण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. दि.३ मार्च १७०० रोजी प्रकृतीअस्वास्थ्यामुळे त्यांचे सिंहगडावर निधन झाले.

!! जयंती व स्मृती सप्ताहनिमित्त छ.राजाराम भोसले महाराजांना अनंत कोटी विनम्र अभिवादन !!

# नांदेड गोळीबारातील मुख्य आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**नांदेड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहरात १० फेब्रुवारी रोजी झालेल्या गोळीबारातील मुख्य आरोपी पकडण्यात पंजाब पोलीस व दहशतवाद विरोधी पथकाला यश आले आहे. बब्बर खालसा इंटरनॅशनलचा अतिरेकी हरविंदरसिंघ ऊर्फ रिंदा संधू याच्या सांगण्यावरूनच हा गोळीबार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. नांदेड शहरातल्या गुरुद्वारा परिसरात १० फ ेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता एकाने केलेल्या गोळीबारात रविंद्रसिंघ दयालसिंघ राठोड (वय ३०) याचा जागीच मृत्यू झाला होता. तर गुरुमितसिंघ सेवालाल हा गंभीर जखमी झाला होता. गुरमितसिंघ याने हरविंदरसिंघ याच्या भावाची २०१५ मध्ये हत्या केली होती, त्या प्रकरणात त्याला जन्मठेपही झाली होती. २२ जानेवारी रोजी तो पॅरोल रजेवर सुटला होता. १० फेब्रुवारीला रविंद्रसिंघ व गुरमितसिंघ हे गुरुद्वारा परिसरातल्या गेट क्र.६ जवळ उभे असताना त्यांच्यावर गोळीबार झाला होता. या प्रकरणात वजिराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तीन दिवसानंतर संपूर्ण प्रकरणाचा तपास दहशतवाद विराधी पथकाकडे वर्ग करण्यात आला.

स्थानिक पोलिसांनी घटनेनंतर आरोपीला मदत करणाऱ्या मनप्रितसिंघ ढिल्लो (वय ३१) व हरप्रितसिंघ कारपेंटर (वय ३५) या दोघांना अटक केली होती, त्यानंतर एटीएसने पंजाबमधून दलजितसिंघ करमसिंघ संधू (वय ४१) व हरजितसिंघ गील (वय ३२) या दोघांना अटक केली तर अर्शददीपसिंघ गील (वय २५) याला ताब्यात घेण्यात आले. या पाचही आरोपींना न्यायालयाने १ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. नांदेड स्थानिक, एटीएस पथक व पंजाब पोलीस यांच्या सम न्वयातून मुख्य आरोपीचा शोध सुरू होता. नांदेडच्या एटीएसने दिलेल्या माहितीनंतर पंजाब पोलीसांनी गोळीबार करणा्या जगदीश ऊर्फ जग्गा (रा. तरंतारण) याच्या मुस्क्या आवळल्या तर त्याचा साथीदार शुभदीपसिंघ ऊर्फ शुभ या दोघांना अटक केली आहे. जगदीशसिंघ याने गोळीबार केल्याची कबुली पंजाब पोलीसांनी दिली. गुरमितसिंघ याची हत्या करण्याचा लक्ष्य होते पण या प्रकरणात रविंद्रसिंघ याचा मृत्यू झाला. कुख्यात अतिरेकी हरविंदरसिंघ याच्या सांगण्यावरूनच हा हल्ला केल्याचे त्याने कबुल केले आहे. या दोघांना अटक झाल्याने या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा आता झाला आहे.

नांदेड एटीएसचे तीन पथकं सध्या पंजाबमध्येच तळ ठोकून आहेत. या दोघांना अटक झाल्यानंतर तेथील न्यायालयाच्या परवानगीने त्यांना नांदेडला आणण्यात येणार आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपी आहेत का? याचा शोध सुरू असल्याचे नांदेड एटीएसचे प्रमुख पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे यांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणाची सर्व बाजूंनी चौकशी सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या गुन्ह्याची उकल करण्यासाठी नांदेडसह अकोला, छ.संभाजीनगर, नागपूर येथील एटीएसचे अधिकारी प्रयत्नरत होते. या गंभीर घटनेचा उलगडा झाल्यानंतर आज सर्वांनी सुटकेचा निश्वास घेतला. विशेष म्हणजे नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार हे या प्रकरणाच्या तपासावर लक्ष ठेवून होते..

# सिद्धार्थ महाविद्यालयात संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सिद्धार्थ महाविद्यालय पडेगाव येथे संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न करण्यात आली. याप्रसंगी डॉ. सविता सोनवणे ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर महाविद्यालयाचे संचालक प्रा. सुनील मगरे आणि प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. सविता सोनवणे म्हणाल्या संत गाडगेबाबा यांचा जन्म अमरावती जिल्हा दर्यापूर तालुक्यामध्ये शेंडगाव येथे एका गरीब कुटुंबात झाला होता. गाडगेबाबा महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार संत आणि सम ाज सुधारक होते. त्यांची राहणी एकदम साधी आणि सामाजिक न्याय आणि स्वच्छता यावर जास्त त्यांच्या भर होता. संत गाडगे महाराजांचे पूर्ण नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर असे होते. तर त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी जानोरकर असे होते. गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले त्या काळातील समाज सुधारक आणि दिन दलित व पीडित लोकांच्या सेवेमध्ये त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. कीर्तनातून त्यांनी समाजाला गोरगरीब दलित जनतेला अंधश्रद्धा अज्ञान आणि अस्वच्छता उच्चाटन करण्याचे धडे दिले. याप्रसंगी महाविद्यालयाचे संचालक प्रा.



सुनील मगरे यांनी महाविद्यालयामध्ये म ानांकनासाठी विद्यार्थ्यांनी सतर्क रहा आणि महाविद्यालयांमध्ये नियमित रहा महाविद्यालयाच्या तासिका अभ्यासक्रम यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे मार्गदर्शन केले .तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी संत गाडगे महाराज यांनी समाज घडवला आणि दिन दलित दुबळ्यांना आलेल्या मदतीतून मदत करण्याचे काम केले ते नेहमी सांगत होते की देव हा माणसात आहे.

माणसांची सेवा करा

गरीब दुबळे अनाथ अपंगांची सेवा करा असे थोर विचार संत गाडगेबाबांनी मांडले मूर्ती पूजा करू नका, सावकारांचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, मंत्र तंत्र चमत्कार असल्या गोष्टीवर विचार ठेवू नका, अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली आणि माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देण्यातील पैशातून रंजल्या गांजल्या अनाथ लोकांसाठी ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालय, आश्रम व विद्यालय सुरू केले आणि मुलांना शिक्षण शिकवा शाळेत पाठवा अशी शिकवण त्यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. राजू वानखडे यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. मिलिंद आठवले यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा शुभम सदावर्ते यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. त्यांचे सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# इंडो जर्मन टूल रूमद्वारे उद्योजगता विकास कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आज पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे शारीरिक शिक्षण म हाविद्यालय, औरंगाबाद येथे इंडो जर्मन टूल रूम, औरंगाबाद द्वारे उद्योजगता विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम केंद्र सरकारच्या MSME मंत्रालयच्या ध्येय धोरणानुसार घेण्यात आला. ह्या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांनी नोकरीच्या पाठीमागे न लागता व त्यांनी स्वतःचा व्यवसाय चालू करावा हा यामागील उद्देश आहे व यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजनाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यक्रमास कॉलेजचे प्राचार्य सूर्यवंशी, इंडो जर्मनचे अनिल मस्के, आनंद निकाळजे व राजेश चंचलानी यांनी मार्गदर्शन केले

# हिंमत असेल तर नीलम गोऱ्हेंनी उद्धव ठाकरेंवर गुन्हा दाखल करावा- बच्चू कडू

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

दिल्लीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. तीन दिवस झालेल्या या संमेलनाला महाराष्ट्रासह दिल्लीत राहणाऱ्या मराठी माणसांनी मोठा प्रतिसाद दिला. पण या साहित्य संमेलनात बोलताना शिवसेना (शिंदे) पक्षाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर एक गंभीर आरोप केला. 'ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या दिल्या की एक पद मिळतं', असं विधान नीलम गोऱ्हे यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर केलं. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. यावरून खासदार संजय राऊत यांनी देखील जोरदार टीका केली.

एवढंच नाही तर शरद पवार यांनी देखील प्रतिक्रिया देत नीलम गोऱ्हे यांचं विधान चुकीचं असल्याचं म्हटलं. दरम्यान, यानंतर आता प्रहार संघटनेचे नेते तथा माजी आमदार बच्चू कडू यांनीही या वादात उडी घेतली. ङ्गहिंमत असेल तर नीलम गोऱ्हेंनी उद्धव ठाकरेंवर गुन्हा दाखल करावाङ्ग, असं बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

# 'एआय' आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व महाराष्ट्र करेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) माध्यमातून राज्य शासनामार्फत प्रशासन व अर्थव्यवस्थेला गती देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य लवकरच देशाच्या 'एआय' आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. हॉटेल ग्रँड हयात येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लीडरशिप समिट कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नॅसकॉमचे श्रीकांत वेलामकन्नी यांनी मुलाखत घेतली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यात डिजिटल सेवांचे प्रमाण वाढले असून, बहुतांश शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत. राज्य शासनाने मुंबई विद्यापीठात 'एआय' सेंटरची स्थापना केली आहे. जागतिक आर्थिक मंचासोबत भागीदारीतून इंडस्ट्री केंद्र स्थापन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने १ ट्रिलियन डॉलरपर्यंत अर्थव्यवस्था नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी राज्याने नीती आयोगाच्या सहकार्याने नवीन आर्थिक रोडमॅप तयार केला जात आहे.

विशेषतः मुंबई महानगर क्षेत्राला (MMRDA) १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**डेटा सेंटर आणि फिनटेक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर** – देशातील ६०% डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. नवीन मुंबईत डेटा सेंटर पार्क उभारण्यात येत असून, २०३० पर्यंत राज्यातील ५०% वीजनिर्मिती हरित ऊर्जेवर आधारित असेल. मुंबई ही भारताची 'फिनटेक राजधानी' असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

**नाशिक कुंभमेळा ; अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**

नाशिक येथे २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. या ठिकाणी गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा, आणि आभासी अनुभव यासाठी अत्याधुनिक उपाययोजना केल्या जातील. यावेळी त्यांनी उत्तर प्रदेशात महाकुंभमेळा यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे कौतुकही केले.

**कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढवणार** – मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'अ‍ॅग्री-स्टॅट' उपक्रमाअंतर्गत संपूर्ण शेती प्रक्रियेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. 'ड्रोन शक्ती' कार्यक्रमांतर्गत ड्रोन प्रशिक्षण देऊन कृषी फवारणी खर्च कमी करण्याचा मानस आहे.

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई** – नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई विकसित करणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ही 'इनोव्हेशन सिटी' देशातील सर्वात प्रगत शहरांपैकी एक ठरेल. तीनशे एकरमध्ये ही सिटी विकसित केली जाणार असून या सिटीमध्ये तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण संशोधन, आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यावर भर दिला जाणार आहे. तसेच महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक येथे जीसीसी पार्क विकसित करणार असल्याचेही ते म्हणाले. यासाठी उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी आपल्या कल्पना आणि योगदान द्यावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

# मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वांनी कटीबद्ध व्हावे - एकनाथ शिंदे

**राजधानीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा भावपूर्ण समारोप.**

**दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू उभारण्यात येणार - अजित पवार**

**संस्कृतीची वाहक असलेल्या भाषेची निगा राखणे सर्वांचे कर्तव्य - डॉ. भवाळकर**

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भाषा ही आपली ओळख, अस्मिता, आणि अभिमान असून भाषा हेच आपले अस्तित्व आहे. भाषा संपली तर आपले अस्तित्वही संपेल हे लक्षात घेऊन तिच्या संवर्धनासाठी सर्वांनी कटीबद्ध व्हावे, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या सम ारोपप्रसंगी केले. मराठीला अभिजात वैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही देताना नवी दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू उभारण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केली.

राजधानीतील तालकटोरा स्टेडिअममध्ये उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत गेले तीन दिवस सुरू असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप आज सायंकाळी झाला. या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषामंत्री उदय सामंत, संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, लोकमत वृत्तपत्रसमूहाचे अध्यक्ष विजय दर्डा, डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी डी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासह अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, कार्यवाह डॉ.उज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, निमंत्रक संजय नहार, शैलेश पगारिया, युवराज शहा यांच्यासह साहित्य महामंडळाचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

**जे जे मराठी, ते ते जोपासण्याची भूमिका सर्वांनी घ्यावी – श्री.शिंदे**

मराठीला वैश्विक पातळीवर नेण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून यासाठी साहित्यिक, विचारवंत आणि शासनाकडून संयुक्तपणे प्रयत्न व्हायला हवेत, अशी अपेक्षा व्यक्त करून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्याच्या कारभारात मराठीचा वाढता वापर होत आहे. सर्वसामान्यांच्या व्यवहार व शिक्षणात मराठीचा वापर वाढण्याची गरज आहे. नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज यांच्या नावे मराठी अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी राज्य शासनाने दहा कोटी रुपये दिले असून लवकरच हे केंद्र कार्यान्वित होणार आहे. राज्य सरकारने राज्यातल्या ग्रंथालयांना अनुदान वाढवून दिले आहे. नवलेखकांकडून कथा, कादंबरी, कवित या सर्वच क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग केले जात



आहेत. यामधून वर्तमानाचा वेध घेवून आजच्या पिढीचे प्रश्न मांडण्याचे धाडस केले जात आहे. या लेखकांच्या साहित्याची दखल घेण्याची जबाबदारी मराठी भाषिकांची आहे. मराठी साहित्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये ग्रंथ प्रदर्शनांचे आयोजन केले जावे, अशी सूचना करतानाच रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठासाठी पुरेसे मनुष्यबळ व निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही श्री. शिंदे म्हणाले.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठीतील विविध साहित्यप्रवाहांचा संगम आहे. महाराष्ट्राच्या भूमीत संतांनी भक्ती संप्रदाय निर्माण केला, तर, वीरांनी शक्ती संप्रदाय निर्माण केला. विविध लोककलांनी मराठी भाषा समृद्ध होत गेली. आता मराठी भाषेच्या अभिजातपणाचा सूर्य उगवलेला आहे, त्याचा प्रकाश सर्वत्र पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. मराठीचा वेलू गगनावरी नेण्यासाठी जे जे मराठी, ते ते जोपासण्याची भूमिका सर्वांनी घ्यावी, असे आवाहन करून श्री. शिंदे म्हणाले, मराठी संस्कृती जपण्यासाठी आपण टोकाचे आग्रही असले पाहिजे. विविध घटकांच्या एकत्रिकरणातून मराठी संस्कृती आणि समाज तयार होतो. तो टिकविण्यासोबतच वाढविला पाहिजे. दोन वर्षांनी १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. येत्या दोन वर्षात मराठीने भाषेने गरुड झेप घ्यावी, मराठी ही आई, ज्ञानेश्वर माऊली, छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, बहिणाबाई, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर अशी सर्वांचीच भाषा आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्लीत झालेले हे संमेलन दीर्घकाळ स्मरणात राहील, असे सांगून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

**नवी दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू – उपमुख्यमंत्री पवार**

मराठीला अभिजात वैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही देताना नवी दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू उभारण्यात येईल, अशी घोषणा करून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, महाराष्ट्राच्या भव्य संस्कृतीला साजेशा अशा या वास्तूसाठी आगामी अर्थसंकल्पात शासन पुरेसा निधी उपलब्ध करून देईल. राज्य शासन अतिशय चांगल्या भावनेने सांस्कृतिक उपक्रमांसाठी मदत करत असते ही बाब लक्षात ठेऊन साहित्यिकांनी स्वाभिमानाने साहित्यनिर्मिती करावी. महाराष्ट्र ातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे सक्तीचे करण्यात आले आहे. याबाबत काही उणीवा असतील तर त्याचा पुन्हा आढावा घेतला जाईल. मराठी ज्ञानभाषा व्हावी, मराठीची उपयुक्तता वाढावी, ती बहुजात आणि बहुज्ञात व्हावी, यासाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजात वैभव प्राप्त करून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, प्रसारासाठी शासन निधी कमी पडू देणार नाही, तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरच्या मराठी भाषिकांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे राहील, असेही श्री पवार यांनी सांगितले.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मि ळाल्यानंतर होणा□या पहिल्याच अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले हा ऐतिहासिक क्षण असल्याचे सांगून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी प्रधानमंत्री श्री. मोदी यांचे आभार मानले. विठ्ठल भक्तांचा मेळा दरवर्षी पंढरीत जमतो. त्याचप्रमाणे, संमेलनाच्या निमित्ताने दरवर्षी वेगळ्या वेगळ्या ठिकाणी साहित्यिकांचा मेळा साहित्य पंढरी निर्माण करतो. भक्तिभाव, समाधान आणि नवीन ऊर्जा या दोन्ही पंढरीचे विशेष गुणधर्म असून साहित्य संमेलनातून मिळणा□या उर्जेतून नवे साहित्य निर्माण व्हावे. साहित्यिकांच्या लेखणीत समाजाला जागृत करण्याची, योग्य दिशा देण्याची क्षमता असते. तिचा वापर सकारात्मक बदलासाठी व्हावा. नवोदित लेखकांना गुणवत्तेनुसार संधी देण्याची भूमिका प्रथितयश साहित्यिकांनी घ्यावी. तसेच साहित्य संमेलनात विविध क्षेत्रातील मराठी भाषिक तरुणांचा सहभाग वाढायला हवा, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केली.

सध्या छावा चित्रपटाच्या निमित्ताने छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास युवा पिढी समोर आला आहे. छत्रपती संभाजी महाराज साहित्यिकही होते. तुळापुर, वढूला त्यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याचेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज अध्यासन लवकरच सुरू होत असल्याची माहिती देऊन मराठी भाषा मंत्री उदय सामंत म्हणाले, साहित्याचा खरा संस्कार या संमेलनाच्या माध्यमातून होत आहे. या संमेलनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेले चाकावरचे साहित्य संमेलन हा अनोखा उपक्रम असून यापुढे होणाऱ्या साहित्य संमेलनानिमित्त अशा यात्री संमेलनाचे नियमित आयोजन व्हावे. त्यास शासनाकडून मदत केली जाईल. मराठी भाषेचा मंत्री म्हणून या विभागाचा कार्यभार सांभाळताना आपण विविध उपक्रमांच्या माध्यमातून मराठीच्या विकासासाठी निष्ठेने प्रयत्न केल्याचे त्यांनी यावेळी आर्वजून सांगितले. देशाच्या राजधानीत मराठीचा जल्लोष होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करून श्री दर्डा म्हणाले, मराठी वाचन संस्कृती जगवण्यासाठी व्यापक प्रयत्न करावे. लोकांची वाचनाची आवड भागविण्यासाठी ग्रंथ विक्रीस प्रोत्साहन द्यावे. नव्या पिढीकडून मातृभाषेचा वापर वाढवण्यासाठी शिक्षणात मराठीचा आग्रहाने अंर्तभाव करणे आवश्यक आहे.

मराठी शाळांच्या सुधारणांसाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त करून संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या, भाषा ही संस्कृतीची वाहक असते. तिची निगा राखणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. चांगले ठराव झाले. ते प्रत्यक्ष आले पाहिजेत. सीमा भागात त्या त्या भाषिकांची संख्या लक्षात घेऊन द्वैभाषिक शाळा सुरू झाल्या पाहिजेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दुय्यम स्तरावरची मराठी शिकवली जाते. त्यात सुधारणा व्हावी. परदेशी भाषांप्रमाणेच भारतातील इतर भाषा शिकण्याची सोय हवी.

शासनाने त्यासाठी कृतिशील पावले उचलावीत. मराठी भाषा वाढण्यासाठी घराघरातील मुले मराठीत शिकली पाहिजेत याची सर्वांनी काळजी घ्यावी. ज्ञान क्षेत्र जर समृद्ध करायचे असेल तर ज्ञानाप्रती तळमळ, आस पाहिजे. तसा समाज ज्ञानसंपन्न होतो. सीमा प्रदेशात संस्कृतीचे अभिसरण घडत असते. 'भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे' ही संत ज्ञानेश्वरांची उक्ती आत्मसात करत आपण स्नेह, प्रेम वाढवूया, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावपूर्ण भाषणाचा समारोप केला.

रिद्धपूर येथे स्थापित मराठी विद्यापीठात नियमित कामकाज तातडीने सुरू व्हावे, त्यासाठी मनुष्यबळ व आर्थिक तरतूद व्हावी, बृहनम हाराष्ट्रातील संस्थांना आर्थिक पाठबळ द्यावे, बोलीभाषांच्या संवर्धनासाठी बोलीभाषा विकास अकादमी स्थापन करावी आदी बारा ठराव यावेळी करण्यात आले.

# ‘नमो किसान सन्मान निधी योजनेंतर्गत’ ३ हजार रुपये वाढविणार - मुख्यमंत्री

**राज्यातील शेतकऱ्यांना आता वर्षाकाठी १५ हजारांचा सन्मान निधी**

**‘पीएम किसान सन्मान योजनेचा’ १९ वा हप्ता वितरण राज्यस्तरीय कार्यक्रम**

**राज्यातील शेतकरी कुटुंबांना ‘पीएम किसान सन्मान निधीचे’ १९६७ कोटी वितरीत**

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या विकासासाठी समर्पित असून या दिशेने जोरकस प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा फायदा होत आहे. राज्य शासनही केंद्राप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना ‘नमो किसान सन्मान निधी योजनेंतर्गत’ ६ हजार रुपये देत असून लवकरच हे अर्थसहाय ३ हजार रुपयांनी वाढविण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारमधील भागलपूर येथे ‘प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण’ झाले. या वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वनामती येथील कै. वसंतराव नाईक स्मृती सभागृहात आयोजित करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे-चवरे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, वनामतीचे प्रभारी संचालक रविंद्र ठाकरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणीस म्हणाले, पीएम किसान सन्मान निधी योजनेद्वारे देशातील शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात आर्थिक मदत मिळत आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासन वर्षाला शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट ६ हजार रुपये वितरीत करते. तर राज्य शासनाच्या वतीने ‘नमो किसान सन्मान निधी योजनेद्वारे’ शेतकऱ्यांना वर्षाकाठी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात येते. आता राज्य शासन या निधीत ३ हजार रुपयांनी वाढ करणार असून राज्याद्वारे ९ हजार आणि केंद्रशासनाचे ६ हजार असे शेतकऱ्यांना आता वर्षाला १५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे.

**सर्व शेतकऱ्यांना सर्व योजनांचा लाभ**

राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी ‘जलयुक्त शिवार योजना’ आणली, त्यातून मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे झाली. केंद्र शासनाकडून ‘बळीराजा जलसंजीवनी योजना’ मंजूर करून घेतली. या योजनेतून विदर्भातील ८९ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात आले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या पहिल्या टप्प्याची अंमलबजावणी करण्यात आली असून दुसऱ्या टप्प्यात मराठवाडा व विदर्भातील उर्वरित भागात या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत कृषी औजार, शेततळी आदी अनुदान पद्धतीने लक्षांक न ठेवता गावातील सर्व शेतकऱ्यांना सर्व योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. ६ हजार कोटींच्या खर्चातून या योजनेंतर्गत आतापर्यंत कामे झाली असून येत्या काळात ही योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी उत्पादक गटांना रोजगारक्षम कृषी प्रक्रिया उद्योग, ग्रेडींग व्यवस्था आदी समग्र सुविधा पुरवणारी ‘स्मार्ट योजना’ आणली असून त्याचा बहुतांश शेतकरी लाभ घेवून विकास साधत आहेत. ॲग्रीस्टॅक ही महत्वाची योजना हाती घेण्यात आली आहे. याद्वारे संपूर्ण शेतीचे डिजीटायजेशन करून प्रत्येक शेतकऱ्याला आवश्यक लाभ देण्यात येणार आहे. मध्यस्थाशिवाय शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्याला लाभ मिळणार आहे. राज्यात आतापर्यंत ॲग्रीस्टॅक अंतर्गत ५४ टक्के शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली असून लवकरच १०० टक्के उद्दीष्ट गाठण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या ५ वर्षात शेतकऱ्यांकडून वीज बिल न घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मागेल त्याला सौरपंप योजना सुरू असून मागील १ वर्षात १ लाख शेतकऱ्यांना याअंतर्गत सौरपंप देण्यात आले आहेत.

सौरपंप घेणाऱ्या शेतकऱ्यांना पुढील २५ वर्षात वीज बिलाची चिंता नसणार असे ही त्यांनी सांगितले. गेल्या अडीच वर्षात १५० पेक्षा जास्त सिंचन योजनांना फेर प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

विदर्भातील शेतीचे चित्र बदलणारा वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प

विदर्भातील शेतीचे चित्र बदलणारा वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या माध्यमातून गोसेखुर्द धरणातील वाया जाणाऱ्या पाण्याचा उपयोग करून वैनगंगा नदीद्वारे ५५० कि.मी. पर्यंत पाणी वाहून नेत बुलडाणा जिल्ह्यातील नळगंगा नदीपर्यंत घेवून जाण्यात येणार आहे. याद्वारे नागपूर, अमरावती, वर्धा, अकोला, बुलडाणा अशा एकूण ७ जिल्ह्यांमध्ये दुष्काळी भागाला याचा फायदा होणार आहे. या प्रकल्पाद्वारे १० लाख हेक्टर जमीन ओलीताखाली येणार असून याद्वारे मोठे परिवर्तन घडेल, असेही त्यांनी सांगितले. ड्रोन दीदी योजनेद्वारे महिलांना प्रशिक्षण देवून ड्रोनद्वारे शेतीत फवारणी करण्याचा अभिनव प्रकल्पही हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शेतीच्या विकासासाठी कृत्रीम बुध्दीमत्तेचा वापर - कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल

कृषीराज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल म्हणाले, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राज्य शासन प्रयत्नरत आहे. पीएम ‘किसान सन्मान निधी’ व ‘नमो किसान सन्मान’ निधीच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढीसाठी व शेतीच्या विकासासाठी कृत्रीम बुध्दीमत्तेचा वापर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे २२ हजार कोटी रूपये देशातील शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यात आले. राज्यातील ९२.८९ लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात १ हजार ९६७ कोटी रूपये थेट वितरीत झाले आहेत. मागील सहा वर्षात पीएम किसान सन्मान निधी योजनेंतर्गत देशातील ३.७ लाख कोटी शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात वितरीत करण्यात आले. तर राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना या योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण १८ हप्त्यांमध्ये ३३ हजार ५६५ कोटींचा लाभ जमा झाला आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते वनामती परिसरातील कृषी प्रदर्शनीचे उद्घाटन झाले. त्यांनी प्रदर्शनीला भेट देवून विविध स्टॉलची पाहणी केली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रगतीशील शेतकऱ्यांना गौरविण्यात आले.

## महाबोधी विहार बिहार येथील आंदोलनासाठी समाजाला आवाहन - प्रा.खिल्लारे सर



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सेक्युलर रिपब्लिकन फेडरेशन ऑफ इंडिया सामाजिक संघटनेच्या महाबोधी विहार बिहार येथील आंदोलन साठी समाजाला आवाहन करण्यासाठी मौजे गेवराई ब्रृक -बॉन्ड पैठण रोड ता जि छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद येथे कॉर्नर बैठक मिटिंग घेण्यात आली यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ दिपक खिल्लारे सर, संघटनेचे विधी सल्लागार अँड शिरीष जी कांबळे सर, प्रदेश कार्याध्यक्ष अशोक भाई गायकवाड, अनिल जी जाधव जिल्हा सचिव, केदारे, मायाबाई केदारे ग्रामीण जिल्हाध्यक्षा, शशिकलाबाई थोरात, दगडाबाई जमधडे, कांताबाई केदारे, व गेवराई येथील महिला मंडळ व मी किशोर ससाणे सर्व उपस्थित राहून महाबोधी महाविहार ब्राह्मणांच्या ताब्यातून मुक्त होण्यासाठी बोधगया येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा व पुढील दिशा कशी राहील याची चर्चा करण्यात आली.

## नवीन संचमान्यता धोरण रद्द करा : शिक्षणतज्ञ प्रा.गवळे




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर( ता.२४) : महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार यावर्षी केलेल्या संच मान्यतेमुळे राज्यभरात हजारो शिक्षक अतिरिक्त होण्याची भीती निर्माण झाली आहे. संचमान्यते मध्ये ६.१ सूचनानुसार ० ते १० पटसंख्या असलेल्या शाळा बंद केल्याशिवाय दुसऱ्या पर्यायी उरत नाही अशी खंत रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिक्षणतज्ञ प्रा. अनिल गवळे यांनी शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद यांच्यासमोर निवेदनाच्या माध्यमातून राज्य शासनाच्या विषयी व्यक्त केली.

राज्यातील १ ली ते ५ वी जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होतील तर दुसरीकडे नवीन सज्ज मान्यतेनुसार इयत्ता ६ ते ८ वी चे वर्ग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. आणि या संचमान्यतेमुळे सक्तीचा व मोफत शिक्षणाचा अधिकार कायदाचे उल्लंघन होणार असल्याचे राज्य शासनाने संच मान्यतांचे सुधारित धोरण यावर्षी प्रसिद्ध केले दिसून येत आहे या धोरणामुळे संच मान्यता शाळा लॉगिनला उपलब्ध झालेले आहेत या संच मान्यतेमुळे लहान शाळां मध्ये दुसऱ्या शिक्षकांच्या मंजुरीसाठी पूर्वीची ६१ विद्यार्थी संख्या पटाची आवश्यकता होती परंतु ती आता ७६ विद्यार्थी संख्या पटा पर्यंत वाढवलेली आहे. त्यामुळे लहान शाळांना तिसरा शिक्षक मंजूर होण्याचा मार्ग जवळजवळ बंद झाला आहे.

इयत्ता ६ ते ८ या वर्गासाठी २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्येच्या शाळांना ० शिक्षक मंजूर झाला आहे. त्यामुळे या वर्गातील मुलांना अन्य गावात शाळा शोधावी लागत आहे. या वर्षाची संच मान्यता प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या ऐवजी आधार व्हॅलिड संख्येवर केले असल्याने अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या पुरेशी असूनही शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत. ज्या विद्यार्थ्याचे आधार व्हॉलिड नाही आषाढी विद्यार्थ्यांची गणना संच मान्यतेमध्ये झाली पाहिजे. जेणेकरून इतर शिक्षकांसाठी जागा उपलब्ध होईल. २१० पेक्षा जास्त पट संख्येला शाळांवर पुढील प्रत्येक शिक्षकांसाठी ३० ऐवजी ४० विद्यार्थी संख्येची अट ठेवली आहेत. संच मान्यतेतील भाषावार रचनेमुळे बहुतांश समाजशास्त्र भाषा विज्ञान पदवीधर शिक्षकांना जिल्हाभरात रिक्त जागा नसल्याचे चित्र आहे. राज्यभरातील शिक्षकांमध्ये या संच मान्यतेच्या निर्णयाविरोधात प्रचंड संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे हा संचमान्यता चा नवीन धोरण असणारा शासन निर्णय रद्द करावा आणि पूर्वीच्या संच मान्यतेच्या निकषासनुसार प्रक्रिया राबवावी असे शिक्षणतज्ञ प्रा. अनिल गवळे यांनी म्हटले . यावेळी निवेदनावर रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेचे प्रदेश संघटक डॉ. लक्ष्मण ढवळे, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोरुडे, जिल्हा सचिव योगेश वाघमारे, जिल्हा महासचिव मुगदल, वाळूज महानगर अध्यक्ष प्रा. प्रवीण आव्हाड यांच्या स्वाक्षऱ्या होत्या.

## महाकुंभ हा सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाचे केंद्र - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**प्रयागराज :** उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्नी सौ. लता शिंदे यांच्यासह महाकुंभ मेळाव्यात शाही स्नान केले. यावेळी मंत्री उदय सामंत, मंत्री दादा भुसे आणि मंत्री भरत गोगावले, मंत्री गुलाबराव पाटील यांनीही शाही स्नान केले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

ते म्हणाले की महाकुंभ हा सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाचे केंद्र आहे. प्रयागराज ही पवित्र भूमी आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा हा संगम आहे. या पवित्र संगमस्थळी स्नान केले की जीवनाचे सार्थक होते, अशी लोकांची श्रद्धा आहे.

१४४ वर्षांनंतर होणारा महाकुंभ अद्भुत आहेत. कोट्यवधी लोक येथे येऊन गेलेत मात्र सगळ्यांना समान वागणूक मिळाली. येथे कोणीही लहान मोठे नाही. ५० कोटी लोकांनी कुंभ स्नान केले हा एक विश्वविक्रम आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. प्रयागराज येथील महाकुंभाची व्यवस्था उत्तम केल्याबद्दल उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे शिंदे यांनी कौतुक केले.

इथ येणारा प्रत्येक भाविक सकारात्मक ऊर्जा घेऊन जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या म ार्गदर्शनात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभ मेळ्याचे उत्तम नियोजन केले. मागील दीड महिना न थकता योगीजी आणि त्यांच्या टीमने महाकुंभ मेळ्याची चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली.

आतापर्यंत ६० कोटी लोकांनी म हाकुंभात स्नान केले. अर्थात भारताच्या निम्म्या लोकांनी गंगा स्नान केले आणि गंगा नदीचे जल घरी घेऊन गेले. गंगेचे पवित्र जल आणि महाकुंभाची सकारात्मक ऊर्जा देशातील घराघरात पोहोचेल आणि देश प्रगती करेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केल. भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याबरोबरच आध्यात्मिक परंपरेला पुढे नेण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र म ोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ करत आहेत, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे अमावस्या निमीत्त २७ रोजी पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन.

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहरापासुन १२ कि.मी.अंतरावरील असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पाश्र्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक २७ फेब्रुवारी गुरुवारी २०२५ रोजी अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर



पाश्र्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस संजीव मनीष मनोज अलोक श्रवन सिंघई परीवार छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्श्वस्थ मंडळ यांनी केले आहे. श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

•**Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** •Email : **attalsanket2023@gmail.com** •RNI No. MAHMAR/2023/87816